RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक २१(८)] सोमवार, डिसेंबर ८, २०२५/अग्रहायण १७, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक १०१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानपरिषदेत दिनांक **८ डिसेंबर, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानपरिषद नियम १११ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

L. C. BILL No. XIII OF 2025.

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १३ .

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता; १९५९ चा ३. १९६२ चा महा. ५. २०२५ चा महा. अध्या. १२.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

प्रकरण एक

प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची सुधारणा.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश," महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १०-१क मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:- १९५९ चा ३.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०-१क ची सुधारणा.

३. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३०-१क मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सरपंच म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण तीन

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.

१९६२ चा महा. ५.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १२क मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतीलः- सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

५. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ४२ मध्ये, पोट-कलम (६क) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतीलः- सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये, पोट-कलम (७क) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सभापती म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

७. (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२५ चा महा. अध्या. १२.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत अधिनियम, १९६१ यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याची कलमे १०-१क व ३०-१क, आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याची कलमे १२क, ४२ व ६७ यांमध्ये अशी तरतूद आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सदस्य किंवा परिषद सदस्याच्या जागेवर किंवा सरपंच, अध्यक्ष किंवा सभापती पदावर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेली प्रत्येक व्यक्ती, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) याच्या तरतुदींनुसार व त्याखाली केलेल्या नियमांनुसार सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र, नामनिर्देशन पत्रासोबत सादर करील.

२. सन २०२५-२०२६ मध्ये, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोठ्या प्रमाणात घेतल्या जाणार आहेत. राखीव जागांसाठी अशा निवडणुका लढविण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जात पडताळणी समित्यांकडे मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त होतील. त्यामुळे, अशा निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यापूर्वी जात पडताळणी समित्यांवर कामाचा अतिभार पडण्याची शक्यता आहे आणि प्रत्येक पाच वर्षांनंतर अशा निवडणुकांपूर्वी अशी स्थिती उद्‌भवू शकते.

जात पडताळणी समित्यांनी वैधता प्रमाणपत्र वेळेत न दिल्याच्या कारणामुळे राखीव जागांवर, अशा निवडणुका लढविण्याच्या संधीपासून संभाव्य उमेदवार वंचित राहू शकतात. राखीव जागांवर निवडणूक लढविणाऱ्या आणि ज्यांनी वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता जात पडताळणी समितीकडे अर्ज केलेले आहेत अशा व्यक्तींना त्या निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा देण्याकरिता, आणि तसेच अशा व्यक्तीने सहा महिन्यात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास त्यांच्या निवडणुका भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मानण्यात येईल अशी तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. १२) हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५.

जयकुमार गोरे,
ग्रामविकास मंत्री.

विधान भवन,
नागपूर,
दिनांक ८ डिसेंबर, २०२५.

डॉ. विलास आठवले,
सचिव (३),
महाराष्ट्र विधानपरिषद

भाग पाच-१०१—२.
एच बी-२४२५—२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES,NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE